# नवी मुंबई महानगरपालिका

## महानगरपालिका सचिव कार्यालय,नवीन मुख्यालय, ३ रा मजला, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक १०/०७/२०१४.**

नवी मुंबई महानगरपालिकेची जुलै महिन्याची सर्वसाधारण सभा, शनिवार, दिनांक १९ जुलै २०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता बेलापूर, भुखंड क्रमांक ०१, सेक्टर १५ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील ५ व्या मजल्यावरील राजमाता जिजाऊ सभागृह येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. इतिवृत्त कायम करणे.

२. प्रश्नोत्तरे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

*३. कोपरखैरणे गांव प्र.क्र.२८ येथील ग्रामपंचायतकालीन नमुंमपाचे जुने विभाग कार्यालय तोडून नविन बांधणे.

*४. सानपाडा, सेक्टर क्र. २४, भूखंड क्र. ५ व ६ या भूखंडाचा "विद्यमान कत्तलखाना व पशुवैद्यकिय दवाखाना (Slaughter House & Veterinary Dispensary)" हया वापराऐवजी "पशुवैद्यकिय रुग्णालय (Veterinary Hospital)" असा वापर बदल करणेबाबत.

५. नवी मुंबई महानगरपालिकेस प्रवासी वाहतूक परवाना असलेली वाहने भाडयाने घेणेबाबत.

६. नवी मुंबई महानगरपालिकेच्या विद्युत विभागासाठी लॅडर व्हॅन वाहने खरेदीबाबत.

७. नवी मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील वाहनांचे निर्लेखन करणेबाबत.

**ठरावाच्या सूचना :**

**८ ते १०. श्री. बहादुर त्रिलोक सिंह बिस्ट, यांजकडून :-**

(८) प्र.क्र.५, इलठणपाडा मधील संपुर्ण गटारे व पदपथ बनवून मिळावे व पेव्हर ब्लॉक लावून मिळावे. (९) प्र.क्र.५, पंढरीनगर शिवशंकर चाळ, जयभवानी चाळ, समाजमंदीर परिसरातील गटारे व पदपथ बनवून पेव्हर ब्लॉक लावून मिळावे. (१०) प्र.क्र.५, इलठणपाडा श्रीराम चाळ व कन्हैयानगर येथे चावडीजवळ नागरिकांना पाणी पुरवठा करिता पाण्याची टाकी (१०,००० लि.क्षमतेची) व वरचापाडा येथे सुध्दा १०,००० लि. क्षमतेची पाण्याची टाकी लावून मिळावी .

**११. सौ. स्वाती अशोक गुरखे, यांजकडून :-**

प्र. क्र. ८२, सेक्टर ६ ते एस.टी.पी. पर्यंत व गुरुद्धारा ते नाल्याला एस.टी.पी. पर्यंत पिचींग करण्यात यावे जेणेकरुन पाण्याचा निचरा व्यवस्थित होईल .

**१२ ते १४. सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**

(१२) प्र. क्र.२१ तळवली नाका अंतर्गत नव्याने विकसित झालेल्या से.२१ मध्ये जवळजवळ १५ ते २० सोसायटया आहे. त्या सोसायटया मध्ये २५०० ते ३००० एवढी लोकवस्ती आहे. सदरचे सेक्टर खाडी शेजारी असल्याने खुप अशा गैरसोयी व असुविधा आहेत त्यामुळे तेथील लोकांना गैरसोयीना सामोरे जावे लागते. तेथे मोठया प्रमाणावर चो-या होतात व सापही आहे. तेथील लोकांना येण्याजाण्यासाठी त्रास सहन करावा लागतो. त्यासाठी से.२१ मध्ये लवकरात लवकर स्ट्रीटलाईटची सोय करणे. (१३) प्र.क्र. २१ मधील सेक्टर २१ मध्ये हायमास्ट टाकणे. (१४) प्र. क्र.२१ अंतर्गत सेक्टर २१ मध्ये रस्ते, गटार व फुटपाथची कामे लवकरात लवकर करणे.

**१५ ते १७. श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून :-**

(१५) कारशेड रेल्वे क्रॉसींग ते सेक्टर २ नेरुळ पर्यंतच्या मुख्य रस्त्याचे रुंदीकरण करणे. (१६) नमुंमपाच्या शाळांमध्ये मुंबई महानगरपालिका शाळेच्या धर्तीवर गरजु विद्यार्थ्यांसाठी रात्रौ अभ्यासिका वर्ग सुरु करणे. (१७) जुईनगर सेक्टर २३ येथील शाहिर कृष्णा पाटील उद्यानास संरक्षकभिंत बांधणे.

**१८ ते २०. श्री. बाळकृष्ण चाहू पाटील, यांजकडून :-**

(१८) प्र. क्र.२० अंतर्गत सेक्टर-२९, ३० येथील नवीन आर.सी.सी. नाला व त्यावर पदपथ बनविणे. (१९) प्र. क्र.२० अंतर्गत सेक्टर - २९, ३० येथील वाघेश्वर मंदिर ते वृंदावन सोसायटीपर्यंत गार्डन व जॉगींग ट्रॅक, लहान मुलांसाठी खेळण्याचे साहित्य टाकणे.

(२०) प्र. क्र.२० अंतर्गत गोठिवली गावाच्या पाठीमागील बाजूस शंकर मंदिर, मरीआई मंदिर ते रबाले रेल्वे स्टेशनपर्यंत डांबरीकरण रस्ता करणे.

**२१ व २२. सौ. विजया रामचंद्र घरत, यांजकडून :-**

(२१) नमुंमपाच्या मार्फत योजना विभागाकडुन विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. तरी पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना विविध वस्तुंचे वाटप प्रभाग निहाय देणे. (२२) प्र. क्र.५८ मधील तुर्भेगांव येथील गुप्ता काटा ते इंडसइंड बँक पर्यंतच्या समांतर असलेल्या सायन पनवेल हायवेचे रस्त्याचे काम पुर्णत्वास आलेले आहे. सर्व्हीस रोड लगत असलेल्या व्यवसाय धारकांकडुन उर्वरीत जागेवर अतिक्रमण होण्याची दाट शक्यता आहे. तरी उर्वरीत जागेवर ग्रीन पट्टा अंतर्गत सुशोभिकरणाच्या दृष्टीने उद्यान निर्माण करणे.

**२३ ते २५. सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**

(२३) प्र. क्र.८१ मध्ये सेक्टर १ मार्केट लगत मोफत अत्याधुनिक वृत्तपत्र वाचनालय उभारणे. (२४) प्र. क्र.८१ मधील सेक्टर ९ येथील रॉक गार्डन मध्ये प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांचे जीवन सुखमय व्हावे, त्यांच्या बद्दलची असलेली आदराची भावना अभिव्यक्त व्हावी या दृष्टिकोनातुन प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांसाठी वर नमुद ठिकाणी पालिकेमार्फत विरंगुळा केंद्र उभारणे.(२५) प्र. क्र.८१ सी.बी.डी. सेक्टर ९ रो-हाऊस मधील मुख्य रस्त्यामध्ये महानगरपालिकेच्या मोठया व्यासाच्या जलवाहिन्या टाकण्यासाठी रस्त्याचे खोदकाम करण्यात आले होते. त्या ठिकाणी पुन्हा रस्त्याचे नव्याने डांबरीकरण करणे.

**२६ व २७. सौ. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून:-**

(२६) सानपाडा प्रभाग क्र.६३, सानपाडा गाव पिंपळपाडा परिसरातील रस्त्यांची व गटारांची फारच दयनीय अवस्था झालेली आहे. स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधकाम करतांना गटारांवर बांधकाम साहित्य टाकल्यामुळे बहुतांशी गटारांवरील स्लॅबही तुटलेल्या अवस्थेत आहे. तरी सदर रस्त्याची डांबरीकरणाने दुरुस्ती करुन रस्त्याच्या एका बाजुस इंटरलॉक टाकुन पदपथ तयार करणे. (२७) सानपाडा विभागाचे मुख्य प्रवेशद्धार असलेले सानपाडा अंडरपास जवळील सर्व परिसर दुर्गंधीमय झालेला आहे. औद्योगिक क्षेत्रातील कामगार वर्ग तसेच सानपाडा विभागात ये जा करीत असलेल्या प्रवाशी वर्गास नाकावर रुमाल बांधुनच पायवाट करावी लागते. तसेच सदर परिसरात पदपथ ही चालण्यायोग्य नसल्यामुळे बहुतांशी वेळा त्यांना लहान सहान अपघातास सामोरे जावे लागते. तरी नवी मुंबई सारख्या सुनियोजित शहरास हेवा वाटावा असे प्रवेशद्धार होण्याच्या दृष्टिकोनातुन सदर परिसराचे सुशोभिकरण करणे.

**२८.श्री. विक्रम धनाजी शिंदे, यांजकडून :-**

नमुंमपा क्षेत्रातील खेळाची मैदाने वर्षातील एकुण ३६५ दिवसांपैकी फक्त ३० दिवस महत्वाच्या उपक्रमांना वापरासाठी दिली जातात. यामध्ये महापुरुषांची जयंती, गणपती उत्सव, नवरात्र उत्सव, विविध धार्मिक उत्सवांचा समावेश आहे. परंतु संपुर्ण वर्षामध्ये विविध उत्सव नवी मुंबईत साजरे केले जातात. या उत्सवामध्ये प्रामुख्याने महिला बचत गटाद्वारे राबविण्यात येणारे उपक्रम, विविध संस्थामार्फत वस्तुंचे प्रदर्शन व विक्री करणे, कोकण महोत्सव, मालवणी महोत्सव, आगरी-कोळी महोत्सव यासारखे जवळपास ५ ते १२ दिवस चालणारे उत्सव/कार्यक्रम आहेत. हे सर्व कार्यक्रम साजरे करण्यासाठी खेळाची मैदाने उपलब्ध करुन देणे.

**२९. श्री. अमित रमेश पाटील, यांजकडून :-**

प्र.क्र.८६ मध्ये से.- २०, बेलापुरगांव येथील जुने वॉर्ड ऑफिसच्या जागेत बांधण्यात आलेल्या सभागृहाचे श्री. राम मारुती मंडळ सभागृह असे नामकरण करणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**

**(चित्रा बाविस्कर)**

**महानगरपालिका सचिव (प्र.),**

**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**

**नवी मुंबई महानगरपालिका,**

**दिनांक १० जुलै २०१४.**